# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/मनपा -२०१६/प्र.क्र.२८/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०१६.

सर्व जिल्हाधिकारी,
(पालघर, धुळे, नंदूरबार, वाशिम, भंडारा व गोंदिया वगळून)

महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, नांदेड-वाघाळा, मिरा-भाईंदर, मालेगाव, भिवंडी-निजामपूर, परभणी, लातूर व चंद्रपूर

विषय:- महानगरपालिकांनी त्यांच्या निधीतून जनजागृती अभियान व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्याबाबत...

संदर्भ:- भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-२३/२०१६-ईआरएस (vol.III), दिनांक- १२/८/२०१६ -"विशेष पुनरिक्षण मतदार यादी कार्यक्रम" (Special Summary Revision of Photo Electoral Rolls with 01/01/2017 as the qualifying date)

महोदय/महोदया,

आपल्याला माहित आहे की, राज्यामध्ये २६ जिल्हा परिषदा, २९६ पंचायत समित्या व १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका मार्च-२०१७ पूर्वी व ७ महानगरपालिका व १ पंचायत समिती यांच्या निवडणुका डिसेंबर-२०१७ पूर्वी होणे आवश्यक आहे.

२. भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या दिनांक १२/८/२०१६ च्या संदर्भीय पत्राद्वारे "विशेष पुनरिक्षण मतदार यादी कार्यक्रमा"चे वेळापत्रक दिले असून, त्याची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

| | | |
|---|---|---|
| (i) | प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी | १५/०९/२०१६ |
| (ii) | मतदारांनी अर्ज दाखल करण्याचा कालावधी | १५/०९/२०१६ ते १४/१०/२०१६ |
| (iii) | आलेल्या अर्जावर निर्णय घेणे | १६/११/२०१६ पर्यंत |
| (iv) | निवडणूक आयोगाचा डेटा बेस अद्ययावत करून विधानसभा मतदार यादी अंतिम करणे | १५/१२/२०१६ |
| (v) | अंतिम विधानसभा मतदार यादी प्रसिध्द करणे | ०५/०१/२०१७ |

(महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १५/०९/२०१६ रोजी सुट्टी असल्यामुळे प्रारुप मतदार यादी दिनांक १६/०९/२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.)

३. सन २०१७ मध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगाने दिनांक १/१/२०१७ हा अर्हता दिनांक ग्राह्य धरुन तयार केलेल्या वरील विधानसभेच्या राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या (Cut off date) मतदार याद्या वापरण्यात येतील.

४. भारत निवडणूक आयोगाचा वरील कार्यक्रम लक्षात घेता मुख्य निवडणूक अधिकारी व सर्व जिल्हाधिकारी यांनी मतदार याद्या अद्ययावत व बिनचूक करण्याची कार्यवाही करावी व त्याकरिता मोठ्या प्रमाणावर जनजागृती अभियान व प्रसिध्दी कार्यक्रम हाती घ्यावा.

५. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे तयार होणारी वरील विधानसभा मतदार यादी २६ जिल्हा परिषदा, २९६ पंचायत समित्या व १७ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी वापरली जाणार असल्याने महानगरपालिकांनी भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन, स्वत:च्या निधीतून मोठ्या प्रमाणावर जनजागृती अभियान व प्रसिध्दी कार्यक्रम राबवावा व सर्व प्रकारच्या माध्यमाचा वापर करावा. उदा. Conventional, Innovative, सोशल मीडिया, CSR, NGO इत्यादी.

६. राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी साहित्याचा एक संच उदाहरण म्हणून आपल्याकडे राज्य निवडणूक आयोगाने अलाहिदा पाठविलेला आहे. त्याचे अवलोकन करावे. अंतिम साहित्य लवकरच पाठविण्यात येईल. या साहित्याच्या आधारे प्रसिध्दी साहित्य तयार करण्यात यावे.

७. जनजागृती व प्रसिध्दीच्या अभावामुळे जर पात्र मतदार अर्ज करू शकले नाहीत किंवा मतदार याद्या अद्ययावत व बिनचूक होऊ शकल्या नाहीत, तर महानगरपालिका क्षेत्राकरिता संबधित महानगरपालिका आयुक्त व ग्रामीण क्षेत्रासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. त्याकरिता विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी समन्वय साधून जनजागृती अभियान व प्रसिध्दी कार्यक्रम हाती घ्यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास दिनांक १०/९/२०१६ पर्यंत पाठवावा.

आपला,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता-
सर्व विभागीय आयुक्त,

F:\राज्य निवडणूक आयुक्तांनी डिक्टेट केलेली पत्र\नप- जिपपंस- मनपा निवडणूक-२०१६-१७.docx